# ‘मराठी बोला, मराठीतच शिका, मराठी भाषा टिकवा’

## मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** साहित्य, संस्कार, संस्कृतीने परिपूर्ण आपली ही भाषा सर्वांना यायलाच हवी. मराठी भाषा केवळ वाचण्यापुरती मर्यादित न राहता त्यात शिक्षण घेणे आवश्यक आहे. आपली मराठी भाषा ही घराघरात पोहोचली पाहिजे, असे आवाहन अभिनेते सुमित राघवन यांनी केले. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा समारोप सोहळा नुकतेच पार पडला. यावेळी सुमित राघवन बोलत होते.



मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे म्हणाल्या, मुंबईसारख्या मेट्रोपॉलिटिन शहरात इतर भाषांची सरमिसळ होत असताना मराठी भाषेवर अतिक्रमण होऊ नये, यासाठी मराठी भाषेचे संवर्धन होणे आवश्यक आहे, म्हणून दरवर्षी आपण मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करतो.

यावेळी एस.के. गुप्ता, ए.ए. भट, अबोध खंडेलवाल, आर. रमणा, राजीव, राजीव कुमार उपस्थित होते. मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त आयोजित विविध स्पर्धेत सहभागी झालेल्या विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त शब्दकोडे, प्रश्नमंजुषा, चारोळी, काव्य लेखन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कॉर्पोरेशनच्या कर्मचाऱ्यांनी स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता.

### स्पर्धेतील विजेत्यांची नावे

**शब्दकोडे**

- चारुहास जाधव, कार्यकारी संचालक (स्थापत्य)
- सुरदास भोसले, सुरक्षा पर्यवेक्षक
- सनिदेव काळोखे, सुरक्षारक्षक

**प्रश्नमंजुषा**

- उमेश गवंडे, उपमहाव्यवस्थापक (लेखा)
- मयुर कदम, कनिष्ठ अभियंता (विद्युत)
- गौरी कार्तिकेय, उपलेखपाल

**चारोळी**

- अश्विनी ब्राम्हणे सहायक (प्रशासन विभाग)
- स्वप्निल ठोकळ, उपअभियंता
- सागर खोलमकर, कनिष्ठ सहायक

**काव्य लेखन**

- योगेश गोताड, शिपाई (नियोजन विभाग)
- रंजीत नायर, उपअभियंता (विद्युत)
- रेखा माझिरे, कनिष्ठ सहायक (पुनर्वसन व पुनर्वसाहत विभाग)